Research Paper
In
Political Science

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol I Issue III,
September, 2012

# 'महाराष्ट्रातील आरोग्य सेवा उपलब्धी आणि आव्हाने'

**प्रा.डोंगरे एल.बी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हु.ज.पा.महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड

**प्रस्तावना :** निरोगी जीवन हे मानवाची प्रमुख गरज आहे. मानवाला अन्न, वस्त्र, निवारा या बरोबरच सदृढ आरोग्याची नितांत आवश्यकता असते. आरोग्य हेच मानवी जीवनाचे धन आहे. आरोग्य आणि शिक्षण हे कुठल्याही सदृढ समाजाचे महत्वाचे आधारस्तंभ आहेत. किंबहूना असे म्हणता येईल की, संपूर्ण समाजाचा वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या दोन बाबीवरच अवलंबून असतो. या दोन मुलभूत बाबी ज्या समाजाच्या मजबूत असतात तो समाज अस्तित्वात असणाऱ्या आणि येणाऱ्या कोणत्याही समस्यांना आणि अडचणींना मग त्या आर्थीक असोत, नैसर्गिक, मानव निर्मीत असोत यासारख्या आपत्तींना मानव खंबीरपणे तोंड देवू शकतो. शिक्षण आणि आरोग्य या मुलभूत बाबी असल्या तरी यात फरक फार मोठा आहे. समाजातील प्रत्येक माणसाला शिक्षीत करता येणे सोपे आहे परंतू प्रत्येकाला निरोगी ठेवणे कठीण आहे. समाजाच्या आणि मानवाच्या निकोप विकासासाठी निरोगी समाज महत्वाचा असतो. त्याच प्रमाणे मानवाच्या निकोप मानव विकासासाठी आरोग्यदायी जीवन अतिशय महत्वाचे असते. म्हणून राज्य घटनेच्या कलम ४७ नुसार व्यक्तीच्या पोषण आणि आरोग्याची काळजी घेणे शासनाचे कर्तव्य आहे. या घटनात्मक तरतुदीला अनुसरून महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र आरोग्य विभागाची / मंत्रालयाची निर्मीती केली आहे. राज्यातील नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेणे हि शासनाची नुसतीच जबाबदारी नसुन आद्यकर्तव्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने आरोग्य सेवेचा विस्तार करुन आरोग्य सेवा ग्रामीण भागात पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील वाढती लोकसंख्या, बदलती जीवनशैली यामुळे मानवाचे आरोग्य ढासाळत चालले आहे. असे असले तरीही महाराष्ट्रातील दर्जेदार आरोग्य सेवेमुळे नवजात बालक मृत्यूदर, आर्युमान, बालमृत्यू प्रमाणात सुधारण हे निकष उत्तम आरोग्य व्यवस्थेचे परिमाण आहेत. याशिवाय राज्य शासना मार्फत जननी सुरक्षा योजना, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, सार्वजनिक लसीकरण, शालेय आरोग्य कार्यक्रम, किटक जन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, क्षय रोग नियंत्रण कार्यक्रम, अंधत्व निवारण कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मुलन, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना इत्यादी योजना आरोग्य सेवा बळकट करण्यास सिध्द झाल्या आहेत.

**महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाची उपलब्धी :** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने सर्वांसाठी आरोग्य या तत्वानुसार आरोग्य विभागाने आपल्या सोयी सुविधा गांव, तांडा, वाडी

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.I. Issue : III.
September, 2012

वस्ती पर्यंत उपलब्ध करुन दिल्या आहेत. महाराष्ट्रातील जनतेचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी विभागाने आपल्या योजना, कार्यक्रम, उपक्रम लोकाभिमुख केले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील मृत्यूदराचे प्रमाण घटून ते आता ६.५ असे आहे. बालमृत्यू दर हा दर हजारी पसत्तीस वरुन अठ्ठावीस वर आला आहे. तत्कालीन आरोग्य मंत्री विमलताई मुंदडा यांनी १५ ऑगस्ट २००७ रोजी डॉक्टर आपल्या गावी या अभिनव उपक्रमाचा प्रारंभ करुन ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक बळकट केली आहे.

ग्रामीण जनतेस सहज सुलभ कार्यक्षम आणि उत्तरदायी आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या दृष्टीने केंद्र सरकारने संपूर्ण देशात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान २००५ पासून सुरु केले आहे. त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने प्रभावीपणे केली आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला विशेषत: ग्रामीण जनता, गरीब महिला, बालकांना गुणवत्तापुर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन आरोग्य सेवेचा विस्तार होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण भागातील आरोग्य विषयक अडचणी समजून घेवून त्या सोडविण्यासाठी ५९३५६ आशा (ASHA : Accrdidated Social Health Activist) ग्रामपातळीवर कार्यरत आहेत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून मोबाईल ॲम्ब्युलन्स ची व्यवस्था करण्यात आली आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होत आहेत. मोबाईल मेडीसीन युनिट अंतर्गत एप्रिल २०१२ पर्यंत ५४,७८४ बाहयरुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. टेलीमेडीसीन या योजनेचा फायदा २७,८१९ रुग्णांना मिळालेला आहे. जननी सुरक्षा अभियाना अंतर्गत गरोदर मातांना प्रसुतीच्या काळात घरापासून ते रुग्णालया पर्यंत जाण्यासाठी १०२ क्रमांकाचा टोल फ्री नंबर असलेली मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत ३१ मे २०१२ पर्यंत १,१२,६०४ गरोदर माता व बालकांना याचा लाभा मिळाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सर्वांसाठी आरोग्य या धोरणानुसार राज्यातील आरोग्य सेवा सक्षम, सदृढ, गतीमान करण्यासाठी राज्य सरकारने २९ जिल्हा रुग्णालये, २ सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, ९ महिला रुग्णालय, ६० ट्रामा केअर सेंटर, ८० उप जिल्हा रुग्णालये, ४५५ ग्रामीण रुग्णालये, १,८१६ प्राथमिक आरोग्य केंद्र, १०,५८० उपकेंद्र तर ४ मनोरुग्णालये, ४० तातडीची सेवा देण्यासाठी फिरती रुग्णालये आहेत. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत एड्स सारख्या गंभीर स्वरुपाच्या आजारा विषयी जनतेमध्ये जाणीव जागृती निर्माण करुन उल्लेखनिय कार्य केले आहे. महाराष्ट्राच्या आरोग्य विभागाने पोलीओ, टि.बी., कुष्ठरोग यासारख्या आजारांवर विभागाने जवळजवळ मात केली आहे. इत्यादी शासनाच्या आरोग्य विभागाची उपलब्धी सांगता येईल.

**महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवे पुढील आव्हाने:** महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रासाठी आरोग्य विभागाच्यावतीने विविध अभिनव उपक्रमाचे, कार्यक्रमाचे, योजना राबविल्या असल्या

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol I Issue III,
September, 2012

तरीही आरोग्य विभागाच्या उणिवांची जाणीव आपणांस दिसून येते. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या तुलनेत रुग्णालयांची संख्या तोकडी आहे. महाराष्ट्रातील ११,२३,७२,९७२ लोकसंख्येला ११३२ नियमीत विशेषज्ञ, ७७१ कंत्राटी विशेषज्ञ, ११५ ईव्हेंट बेसीक डॉक्टरांची संख्या अपुरी आहे. भारतात २००० व्यक्तींसाठी १ डॉक्टर आहे. तर अमेरिकेत ४६९ जनतेसाठी १ डॉक्टर आहे. महाराष्ट्रात / भारतात वैद्यकिय शिक्षण घेवून मागच्या ३ वर्षात ३०,००० डॉक्टर परदेशात गेले आहेत. विकसीत राष्ट्रांमध्ये एकुण डॉक्टरांच्या तुलनेत ५% डॉक्टर हे भारतीय आहेत. आज ५३% परिचारीकेचा अभाव आहे. ७६% डॉक्टरांचा, ८८% विशेषज्ञांचा अभाव आहे. राज्यात वैद्यकिय शिक्षण घेवून व्यवसाय करण्यासाठी विदेशात जाणाऱ्या डॉक्टरांवर कडक कार्यवाही केली पाहिजे. महाराष्ट्र शासनाने स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी गर्भजल लिंग परीक्षण कायदा निर्माण केला आहे. गर्भजल लिंग परीक्षण कायदयाचे प्रभावी अंमलबजावणी अभावी हजारो कळया उमलण्याआधीच खुडून टाकल्या जात आहेत. बीड च्या सुदाम मुंडे सारख्या पाशवी डॉक्टराने १००० कळया उमलण्याआधीच खुडून टाकल्या आहेत हा प्रकार म्हणजे आरोग्य विभागाला आणि पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारा आहे.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयात मासुम या सामाजिक सेवाभावी संस्थेमार्फत आरोग्य सुविधांबाबत जनसनसुनवाईचे आयोजन करण्यात आले होते. या जनसुनवाईला ४०० नागरीक, आरोग्य उपसंचालक, पत्रकार, डॉक्टर यांना बोलावण्यात आले होते. आरोग्य सेवा नाकारलेल्या महिलांनी आपल्या तक्रारी मांडल्या एका महिलेने ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांनी ३००/- रुपये मागीतल्याचे सांगीतले आहे. कौटूंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलेकडून याच डॉक्टर महाशयांनी वैद्यकिय प्रमाणपत्र देण्यासाठी १००/- रुपये घेतल्याचे उघड झाले आहे. बेलसर या गावातून सासवड ग्रामीण रुग्णालयात बाळांतपणासाठी आलेल्या एका महिलेला आरोग्य सुविधा रुग्णालयात उपलब्ध असतांना तीला ससुन रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. या महिलेने ४० कि.मी.जाण्याऐवजी खाजगी दवाखाना गाठला त्या ठिकाणी बाई सुखरूप बाळांत झाली परंतू ४५००/- रुपये विनाकारण खर्च आला. रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक असणाऱ्या रक्तपेढयांची संख्या शासनाने वाढवावी. रक्तदान करण्यासाठी समाजामध्ये जाणीवजागृती निर्माण केली पाहिजे. खाजगी रक्तपेढयात चालणारा गैरव्यवहार थांबवून शासनाने त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण प्रस्थापीत केले पाहिजे. याशिवाय अमरावती जिल्हयातील मेळघाट मधील बालकांच्या कुपोषणाचे, वाढता एड्स चा प्रसार, सिकलसेल सारखा गंभीर आजार हे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागासमोर मोठी आव्हाने आहेत. या आव्हानावर शासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्या पाहिजेत.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने सर्वांसाठी आरोग्य या धोरणांनुसार ग्रामीण भागापर्यंत आपल्या सेवांचा विस्तार करुन जबाबदारी पार पाडली असली तरी आरोग्य विभागासमोर अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी विभागातील सर्व

ISSN 2278-8204
Vol.I, Issue : III,
September, 2012

घटकांनी प्रभावीपणे जबाबदारीने आपले कर्तव्य बजावल्यास आरोग्य विभाग निश्चितच आव्हानांवर मात करु शकतो. आरोग्य सेवेतील कणा असणाऱ्या डॉक्टरांनी वैद्यकिय सेवेची पदवी घेतांना जी शपथ घेतो त्या शपथेला स्मरून महाराष्ट्रातील प्रत्येक डॉक्टराने सजगपणे जबाबदारीने कार्य केल्यास आरोग्य सेवा सक्षम, गतिमान, कार्यक्षम होवून समाजातील सर्व स्तरापर्यंत आरोग्य सेवेचा लाभ होवून ती खऱ्या अर्थाने लोकाभिमुख होईल.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

| | |
|---|---|
| १) लोकराज्य | ऑगस्ट २००६ |
| २) कुरूक्षेत्र | मे २०११ |
| ३) पीपल्स पॉलीटिक्स | सप्टेंबर २०१० |
| ४) लोकराज्य | ऑगस्ट २०१२ |
| ५) दैनिक लोकसत्ता | १० ऑक्टोबर २०११ |
| ६) www.maharashtra.gov.in | |